# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक 20/1/2020

## सभा सुचना क्रं.10 दु.4.30 वा.

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **मागील मा. सर्वसाधारण सभा दि. 13/12/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.** | **ठराव :-** मागील मा.सर्वसाधारण सभा दि. 13/12/2019 रोजीचे कायम केलेले इतिवृत्त मंजूर करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **प्रश्नोत्तरे** | |
| 3. | **शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव.** | |
| 4. | **श्री. अभिजीत महेश सोलंकी यांना वारसाहक्काने "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती करणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्री. महेश किसन सोलंकी, सफाई कामगार हे दिनांक 31/07/2019 रोजी स्वेच्छा सेवानिवृत्त झाले असुन त्यांचा मुलगा श्री. अभिजीत महेश सोलंकी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **श्रीम. सरोज विजय सोलंकी हीस वारसाहक्काने सफाई कामगार या पदावर नियुक्ती देणेबाबत.** | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -सी, चंदनसार, विरार विभाग आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती शांता सोमा सोलंकी, सफाई कामगार हे दिनांक 31/05/2019 रोजी नियत |

| | | |
|---|---|---|
| | | वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन त्यांची मुलगी श्रीमती सरोज विजय सोलंकी हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **श्री. सचिन कालिदास वालोद्रा यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत ''सफाई कामगार'' या पदावर सामावुन घेणेबाबत.** | **निर्णय/ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई आस्थापनेवरील कर्मचारी कै.श्री.कालिदास ओगल वालोद्रा सफाई कामगार हे दिनांक 22/09/2018 रोजी मयत झाले असुन त्यांचा मुलगा श्री. सचिन कालिदास वालोद्रा (वय 21 वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक 21 ऑक्टोबर, 2011, शासन परिपत्रक दिनांक 26 फेब्रुवारी, 2014 व शासन निर्णय दिनांक 11 मार्च, 2016 मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ई नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री. रमेश अनंत राऊत, लिपीक-टंकलेखक स्वेच्छा सेवानिवृत्ती देणेबाबत.** | **ठराव/निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. रमेश अनंत राऊत, लिपीक-टंकलेखक, प्रभाग समिती- ई, नालासोपारा (प.) यांना दि. 28/02/2019 रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 66 (1) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री.रमेश अनंत राऊत, लिपीक-टंकलेखक यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 8. | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती आशा नारायण चव्हाण, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत.** | **ठराव/निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती आशा नारायण चव्हाण, सफाई कामगार यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती आशा नारायण चव्हाण यांची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 66(1) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक 13/02/2020 रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती आशा नारायण चव्हाण यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (अफीफ शेख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजुर** |
| 9. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती दर्या विजय सोलंकी, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत.** | **ठराव/निर्णय** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती दर्या विजय सोलंकी, सफाई कामगार यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती दर्या विजय सोलंकी यांची 20 वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण झाली असल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 66(1) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक 01/02/2020 रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती दर्या विजय सोलंकी यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (अफीफ शेख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती -जी, वालीव आस्थापनेवरील कर्मचारी श्री.जगदीश भालचंद्र सुतार, उपअधिक्षक यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणेबाबत.** | **ठराव/निर्णय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. जगदीश भालचंद्र सुतार, उपअधिक्षक, प्रभाग समिती- जी, वालीव यांना दि. 31/01/2020 रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम 1982 चा नियम 66 (1) अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच श्री.जगदीश सुतार, उपअधिक्षक यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

<table>
<tr>
<td>11.</td>
<td>वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - ई, नालासोपारा आस्थापनेवरील कर्मचारी श्री. हेमंत यशवंत पिंपळे , लिपिक यांना 20 वर्षे सेवा पूर्ण झाल्याने स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत.</td>
<td>प्रस्तावाचा निर्णय :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती - ई, नालासोपारा कार्यालयाच्या आस्थापनेवरील लिपिक पदावरील कर्मचारी श्री.हेमंत यशवंत पिंपळे, लिपिक यांनी महानगरपालिका सेवेतून दि.13/04/2017 रोजी स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती अर्ज केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन नियम) 1982 नियम 66(2) नुसार त्यांना दि.13/07/2017 रोजी पुर्व लक्षी प्रभावाने मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच दि.29/05/2016 ते दि.13/07/2017 या गैरहजेरी कालावधीबाबत रजा नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री.हेमंत यशवंत पिंपळे, लिपिक यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषांगिक लाभ अदा करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेत येत आहे.<br>
अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>
ठराव सर्वानुमते मंजूर</td>
</tr>
<tr>
<td>12.</td>
<td>तत्कालीन नालासोपारा व नवघर - माणिकपूर या नगरपरिषंदाकडे वर्ग झालेल्या पेल्हार धरण योजनेवरील 256 ई-फॉर्म वरील कर्मचाऱ्यांना रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर सामावून घेणेबाबत.</td>
<td>ठराव/निर्णय :-<br>
प्रशासनाने खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.<br>
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे यांनी सद्य स्थितीत शासन प्रचलीत धोरण वेळोवळी निघालेले आदेश व नियमास अनुसरून शासन निर्णयाप्रमाणे ठाणे जिल्हा परिषदेतील आस्थापनेवर जिल्हा परिषदेने नियमित करणे कर्तव्य असल्याने खालील वर्ग क श्रेणीतील वेतनश्रेणी रू. 5200-20200 ग्रेड पे रू. 1900 व 6 व्या वेतना आयोगानुसार महागाई भत्ता व इतर भत्ता देण्यास अनुक्रमांक 8 मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून खालील कर्मचाऱ्याला सेवा विषयक लाभ खालील अटी व शर्तीला अधिन राहून देण्यात येत आहे, असे आदेश क्र. ठाजिप/ग्रापापु/आस्था-1 वशी 221, दि. 4/06/2019 अन्वये कळविलेले आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>कर्मचाऱ्यांचे नाव</th><th>पद</th><th>नेमणूकीची तारीख</th><th>पाच वर्षांनी नियमित आस्थापनेवर घेण्याची तारीख</th><th>देय वेतनश्रेणी</th><th>कार्यरत ठिकाण</th><th>ज्या दिनांकापासून रुपांतरीत अस्थायी आस्थापनेवर घ्यावयाचा आहे तो दिनांक</th></tr>
<tr><td>1</td><td>2</td><td>3</td><td>4</td><td>5</td><td>6</td><td>7</td><td>8</td></tr>
<tr><td>1</td><td>श्री. व्हि. के. जाधव</td><td>पंपचालक (256 ई)</td><td>26/4/1985</td><td>26/4/1990</td><td>5200-20200 ग्रेड पे 1900</td><td>वसई विरार मनपा</td><td>26/4/1990</td></tr>
<tr><td>2</td><td>श्री. एस. एल.</td><td>पंपचालक (256</td><td>1/01/1991</td><td>1/01/1996</td><td>5200-20200 ग्रेड पे 1900</td><td>वसई विरार</td><td>1/01/1996</td></tr>
</table></td>
</tr>
</table>

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पवार | ई) | | | | मनपा | |
| 3 | श्री. टी. आर. किणी | गाळणी चालक (256 ई) | 1/01/1987 | 1/01/1992 | 5200-20200 ग्रेड पे 1900 | वसई विरार मनपा | 1/01/1992 |
| 4 | श्री. डि. जी. नाईक | मस्टर कारकून (256 ई) | 16/01/1996 | 16/01/2001 | 5200-20200 ग्रेड पे 1900 | वसई विरार मनपा | 16/01/2001 |
| 5 | श्री. ए. एस. सय्यद | पंपचालक (256 ई) | 2/06/1990 | 2/06/1995 | 5200-20200 ग्रेड पे 1900 | वसई विरार मनपा | 2/06/1995 |

256 ई फॉर्म मंजूरीवरील नेमणूक असल्याने उपरोक्त पाच कर्मचाऱ्यांना त्यांची सुरूवातीची सलग सेवा पाच वर्ष पूर्ण झाल्याचे तारखेपासून वेतन निश्चितीकरता सेवा विचारात घेऊन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने 6 व्या व 7 व्या वेतन आयोगानुसार येणाऱ्या वेतन निश्चिती प्रमाणे वेतन व भत्ते त्याप्रमाणे सेवा विषयक लाभ संबंधीत कर्मचाऱ्यांना अनु. क्र. 8 मध्ये दर्शविलेल्या पासून विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून लागू केल्याचे आदेशात नमूद आहे.

**अटी व शर्ती**

1) संबंधीत कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते येणारा खर्च महानगरपालिकेने करावयाचे आहे.

2) संबंधीत कर्मचाऱ्यांना रूपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवरी सामावुन घेण्याचे पूर्वीच मागील कालावधीचा फरक सेवानिवृत्ती वेतन व भत्ते जिल्हा परिषद स्वनिधीतून अनुज्ञेय राहणार नाही.

3) संबंधीत कर्मचाऱ्यांच्या संपूर्ण सेवा विषयक आर्थिक बाबी महानगरपालिकेने पहावयाचे आहेत.

4) रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवरील प्रत्येक पदांकरीता विहित करण्यात आलेली शैक्षणीक वयोमर्यादेची अट संबंधीत पदे धारण करणाऱ्या बाबत शिथील करण्यात येतील.

उक्त अटींनुसार उपरोक्त पाच कर्मचाऱ्यांपैकी खालील चार कर्मचाऱ्यांची शैक्षणीक अर्हतेची अट शिथील करावी लागेल. असे आदेशामध्ये नमुद आहे. आदेशातील अनु क्र. 4 वरील श्री. डि.जी. नाईक यांचा 5 वर्षाचा कालावधी दि. 16/01/2001 रोजी पूर्ण होत आहे. कालेलकर अवार्डनुसार निर्गमित केलेल्या दि. 4/04/2001 च्या शासन निर्णयानुसार दि. 31/12/1998 पर्यंत 5 वर्ष पुर्ण होणे अपेक्षित आहे. तथापी श्री. नाईक यांचा 5 वर्षाचा कालावधी दि. 16/01/2001 रोजी पुर्ण होत आहे.

| अ. क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | सवेत लागल्याची तारिख | धारण केलेली शैक्षणिक अर्हता | आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 | व्ही.के. जाधव | पंपचालक | 2/4/1985 | 9 वी पास I.T.I (तारतंत्री डिप्लोमा) | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) अनुभवास प्राधान्य | शैक्षणिक अर्हता शिथिल करणे आवश्यक |
| | | 2 | एस.एल.पवार | पंपचालक | 1/1/1991 | S.S.C तारतंत्रीचे अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र | महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) अनुभवास प्राधान्य | **शैक्षणिक अर्हता शिथिल करणे आवश्यक** |
| | | 3 | टि.आर.किणी | गाळणी चालक | 1/1/1987 | H.S.C | शासनमान्य विद्यापिठाची विज्ञान शाखेचा रसायन शास्त्र विषयातील पदवी, M.S.C.I.T. किंवा तत्सम प्रमाण पत्र (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने प्रदान केलेले) | **शैक्षणिक अर्हता शिथिल करणे आवश्यक** |
| | | 4 | डि.जी. नाईक | मस्टर कारकुन | 16/1/1996 | B.A, MSCIT | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन 30 | दि. 4/04/2001 च्या न्या. कालेलकर |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | श.प्र.मि. (जीसीसी) / इंग्रजी चंकलेखन 40 श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक. | ॲवार्ड नुसार दि. 31/12/1998 पर्यंत 5 वर्षाची सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याचे निर्देश आहेत. तथापी श्री. नाईक यांचा 5 वर्षाचा कालावधी दि. 16/01/2001 रोजी पूर्ण होत आहेत. त्याबाबत शासनास कळविणे आवश्यक आहे. |
| 5 | ए.एस. सय्यद | पंपचालक | 2/6/1990 | H.S.C. तारतंत्रीचे अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्य औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या | शैक्षणिक अर्हता शिथिल करणे आवश्यक |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) अनुभवास प्राधान्य | |

सदर कर्मचाऱ्यांना आदेशात नमूद केलेल्या दिनांकापासून सामावुन घेतल्यास त्यांचे वेतन व भत्यांचा खर्च महानगरपालिकेवर पडणार असल्याने सदर कर्मचारी दि. 15/10/2001 रोजी महानगरपालिकेकडे सदर योजना हस्तांतरीत झालेल्या दिनांकापासून त्यांना वेतन भत्ते ध्यावे अगर कसे, याबाबतचा निर्णय घेणे आवश्यक आहे. सदर कर्मचारी यांना रूपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर सामावून घ्यावयाचे झाल्यास सदरची पदे रिक्त असणे आवश्यक आहे. सद्या महानगरपालिकेच्या आस्थापनेवर पंप चालकांची सात पदे मंजूर असून सातही पदे भरलेली आहेत. गाळणी निरीक्षकांची तीन पदे मंजूर असून तीन्ही पदे रिक्त आहेत. आस्थापनेवर पंप चालकांची तीन पदे निर्माण करणे आवश्यक आहे. न्या. कालेलकर यांच्या करारानुसार निर्गमित केलेल्या दि. 4/04/2001 रोजीच्या शासन निर्णयानुसार दि. 31/12/1998 पर्यंत कर्मचाऱ्यांच्या सेवेची 5 वर्ष पूर्ण होणे अपेक्षित आहे. त्यानुसार पेल्हार धरण योजने वरील 256 ई-फॉर्म वरील 5 कर्मचाऱ्यांपैकी 1) व्ही.के.जाधव, 2) एस.एल.पवार, 3) टि.आर.किणी, 4) ए.एस.सय्यद, यांचा 5 वर्षाचा कालावधी दि. 31/12/1998 पूर्वी पूर्ण होत आहेत. परंतू सदर कर्मचाऱ्यांच्या पदाची शैक्षणिक अर्हता शिथिल करणे आवश्यक आहे. तसेच 5) श्री. डी.जी.नाईक यांचा 5 वर्षाच्या कालावधी दि. 16/01/2001 रोजी पूर्ववत होत असल्याने श्री. नाईक यांचा प्रकरणी न्या. कालेलकर यांच्या करारातील अटींची पुर्तता होत नाही. सदर कर्मचारी यांना महानगरपालिकेत रुपांतरीत नियमित अस्थायी आस्थापनेवर सामावून घेणे व त्यांची शैक्षणिक अर्हता शिथील करणे कामीचे प्रकरण शासनाकडे न पाठविता उक्त सर्व कर्मचाऱ्यांचे शासन हे महानगरपालिका असल्याने त्यांची शैक्षणिक अर्हता शिथीन करून मा. मुख्य कार्यकारी ठाणे यांचे आदेशान्वये त्यांना सेवेत सामावून घेणेस आजची मा. महासभा मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त 256 - ई फॉर्म वरील 5 कर्मचाऱ्यांना कालेलकर करारानुसार सेवेत लागलेल्या दिनांकापासून 5 वर्ष पूर्ण झालेनंतर रुपांतरीत आस्थापनेवर घ्यावयाच्या दिनांकापासून सेवाविषयक व वेतनविषयक लाभ मंजूर करणेस आजची ही सभा मंजूरी देत आहे. उपरोक्त ठरावाप्रमाणे प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी, असे निर्देश आजची ही मा. महासभा देत आहे.

**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

| | | |
|---|---|---|
| 13. | **प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील वॉर्ड क्र.106 मधील उमेळा येथे बहुउद्देशीय इमारत बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली वरील कामी तयार करणेत आलेल्या रु.1,90,40,585/- इतक्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे. त्यानुसार सदर कामाचे अंदाजपत्रकास आवश्यक तांत्रिक मंजूरी घेवून निविदेची कार्यवाही करणेस तसेच त्याकामी अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वार्ड क्र.42 मधील वाकणपाडा येथे ख्वाजा पॅलेस ते गरीब नवाज अपा. पर्यंत रस्ता खडीकरण करणे. कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत कामाला प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर कामी अनुषंगाने येणाऱ्या रु. 85,02,881/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 15. | **सन** 2020-21, 2021-22 **व** 2022-23 **या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी विविध रसायणे (क्लोरिन गॅस टनर व पी.ए.सी.) पुरवठा करणे या कामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय** :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास अंदाजीत रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 16. | **सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी ॲलम पुरवठा करणे या कामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामास अंदाजीत रक्कमेस प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे व पुढील निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br><br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 17. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.36 मध्ये बोळींज येथे सर्व्हे क्र.388 मध्ये माती माती भराव करणे व कंपाऊंड बांधणे या कामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणे बाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु. 1,53,86,368/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br><br>**अनुमोदक :- (सखाराम महाडिक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 18. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन 2020-21 या वित्तीय वर्षा करिता आवश्यकतेप्रमाणे औषधे, उपकरणे, रुग्णालयीन साहित्य, साथ प्रतिबंधक लस, यंत्रे व कापड प्रकार खरेदी तसेच ऑक्सिजन सिलेंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या मंजुर असलेल्या सर्व ई -निविदांना सन 2020-2021 या वर्षाकरीता मुदतवाढ मिळणेबाबत तसेच याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव/ निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या दैनंदिन कामकाजाच्या व्यवस्थापनेसाठी सन 2020-21 या वित्तिय वर्षाकरिता आवश्यकते प्रमाणे औषधे, उपकरणे, रुग्णालयीन साहित्य, साथ प्रतिबंधक लस, यंत्रे व कापड प्रकार खरेदी तसेच ऑक्सिजन सिलेंडर सेवा, साहित्य उपकरणे देखभाल दुरुस्ती या कामांच्या मंजुर असलेल्या सर्व ई-निविदांना सन 2020-21 या वर्षाकरिता मुदतवाढ मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेण्यात आला की, वरील सर्व बाबींची नविन ई-निविदा प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यात यावी तुर्तास सदरचा विषय स्थगित करण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 19. | **सन 2020-21 हया वित्तीय वार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मध्ये पावसाळयापूर्वी नालेखोदाई करणेसाठीच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-2 निविदा दर मागविणेकामी मान्यता देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** सन 2020-21 ह्या वित्तीय वर्षीक वर्षाकरीता वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मध्ये पावसाळ्यापुर्वी नालेखोदाई करणेकामी होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे सन 2020-21 या वर्षाकरीता बी-2 निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br><br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 20. | **सन 2020-21 सन2021-22 व सन 2022-23 हया त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लांगाराची नियुक्ती करुन होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देऊन पुढील तीन वर्षाकरीता ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी- 2 निविदा दर मागविणे कामी मान्यता देणेबाबत.** | **ठराव** :- सन 2020-21 सन 2021-22 व सन 2022-23 हया त्रैवार्षिक वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती A,B,C,D,E,F,G,H,I मधील विविध विकास कामे करण्यासाठी तांत्रिक सल्लांगाराची नियुक्ती करुन होणाऱ्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणाली द्वारे पुढील तीन वर्षाकरीता ई-निविदा दर मागविण्यात यावे ही सभा ठरवित आहे.<br>**अनुमोदक :- (उमेश नाईक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 21. | **सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक दिवाबत्ती देखभाल दुरुस्ती करीता साहित्य पुरवठा करणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करुन असा निर्णय घेण्यात आला कि, सन 2020-21, 2021-22 व 2022-23 या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सार्वजनिक दिवाबत्ती याचसोबत कार्यालये, सांस्कृतिक भवन, समाजमंदिर, आरोग्य केंद्र, रुग्णालये व बहुद्देशिय इमारत इत्यादी ठिकाणांची विद्युत व्यवस्था देखभाल दुरुस्तीकरिता आवश्यक विद्युत साहित्य खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन त्रैवार्षिक निविदा मागविणे व त्याकामी येणाऱ्या प्रतिवर्षी 6 कोटी प्रमाणे खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे.<br><br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 22. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथिल साफसफाई व्यवस्थापन सेवा साहित्य व मनुष्यबळासह पुरविणे या कामासाठी सन 2019-20, 2020-21, 2021-22 या वित्तीय वर्षाकरीता ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथिल 'साफसफाई व्यवस्थापन सेवा साहित्य व मनुष्यबळासह पुरविणे' या कामासाठी सन 2019-20, 2020-21, 2021-22 या वित्तीय वर्षाकरिता ई-निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, तुर्तास सदर कामाची ई-निविदा प्रक्रिया न करता महानगरपालिकेच्या मंजूर निविदाधारकामार्फत आवश्यक मनुष्यबळ नेमून वैद्यकीय आरोग्य विभागाअंतर्गत कार्यरत रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्र व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र येथील साफसफाई करण्यात यावी. याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तथापि, भविष्यात कामाची निकड पाहून व रुग्णालय स्वच्छतेसाठी कुशल कर्मचाऱ्यांची गरज पाहून "साफसफाई व्यवस्थापन" बाहय स्त्रोतामार्फत करण्याचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात यावा.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 23. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत असलेल्या ANM ही पदे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाना (NUHM) मधुन वसई विरार शहर महानगरपालिकेत वर्ग करणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकरीता शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत असलेल्या ANM ही पदे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियाना (NUHM) मधून वसई-विरार शहर महानगरपालिकेत वर्ग करणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत थेट मुलाखतीद्वारे 11 महिन्यासाठी करार पध्दतीने नियुक्त केलेल्या 4 ए.एन.एम. यांना प्रस्तावात नमुद केले प्रमाणे शासनाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत असलेल्या 4 ए.एन.एम. यांचे अनुदान बंद केलेनुसार सदर 4 ए.एन.एम. महानगरपालिकेकडे वर्ग करणेस मंजूरी देण्यात आलेली असून सदरच्या 4 ए.एन.एम. यांना महानगरपालिकेच्या 6 महिन्याच्या करार पध्दतीने नियुक्ती करणेस व सदरचा सहा महिन्याचा सेवा कालावधी समाप्त झाल्यानंतर किंवा दरम्यानच्या कालावधी मध्ये महानगरपालिकेने वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी वर्ग 6 महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्त करणेकामी होणाऱ्या निवड प्रक्रियेनुसार 4 ए.एन.एम. यांची नियुक्ती करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (राजेंद्र कांबळी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 24. | **गाव मौजे निळेमोरे सर्व्हे क्र.73 प्लॉट नं. ब/ब आणि ब/अ मधील अस्तित्वातील रस्त्या ऐवजी नविन लेआऊट मधील रस्त्यास नाहरकत देणेबाबत.** | **ठराव / निर्णय :-** उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत येते की, इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट बँक एम्लॉईज को. आ. हौ. सो. लि. या संस्थेने सादर केलेल्या पुर्न:विकास प्रकल्पाच्या ले आऊट प्लॅन प्रमाणे 6 मी. रुंद व 125 मीटर लांबीचा रस्ता बांधकाम स्पेसिकेशन नुसार प्रथम तयार करणे तसेच सदर रस्त्याच्या बाजुस स्टॉर्म वॉटर ड्रेनेज / पाईप गटार त्यावर फुटपाथ व रोड लाईट व्यवस्था करुन रस्ता रहदारीसाठी खुला करावा तद्नंतर अस्तित्वातील 4.50 मी. रुंद रस्ता बंद करण्यास हि सभा मान्यता देत असुन वरील प्रस्तावात नमुद अ.क्र. 1 ते 9 प्रमाणे अर्जदार कार्यवाही करेल या अटीवर नाहरकत दाखला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 25. | **प्र.क्र.20 मध्ये विरार (प.) जुने पोस्ट ऑफिस जवळील 12 मी. DP रस्त्यासाठी जागा संपादन करणेबाबत.** | **ठराव :-** विरार (प.) जुने पोस्ट ऑफिस जवळील 12 मी.DP रस्त्यासाठी जागा तडजोडीने अथवा तातडीने भूमी संपादन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 26. | **प्र.क्र. 29 मध्ये विरार (प.) प्रथमेश अपार्ट ते मुख्य रस्त्यापर्यंत 12/20 मी. DP रस्त्यासाठी जागा संपादन करणेबाबत.** | **ठराव :-** विरार (प.) प्रथमेश अपार्ट. ते मुख्य रस्त्यापर्यंत 2/20 मी DP रस्त्यासाठी जागा तडजोडीने अथवा तातडीने भूमी संपादन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (हार्दिक राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 27. | **प्र.क्र.31 मध्ये विरार (प.) ग्रामीण रुग्णालय ते एस.टी. डेपो (गावठण) 9 मी. DP रस्त्यासाठी जागा संपादन करणेबाबत.** | **ठराव :-** विरार (प.) ग्रामीण रुग्णालय ते एस.टी. डेपो (गावठण) 9मी. DP रस्त्यासाठी जागा तडजोडीने अथवा तातडीने भूमी संपादन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सखाराम महाडीक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 28. | **प्र.क्र.29 मध्ये विरार (प.) कै. भास्कर वामन ठाकूर मंडई ते प्लॅटफॉर्म क्र.1 पर्यंत असलेल्या 12/20 मी. DP रस्त्यासाठी जागा संपादन करणेबाबत.** | **ठराव** :- विरार (प.) कै. भास्कर वामन ठाकूर मंडई ते प्लॅटफॉर्म क्र.1 पर्यंत असलेल्या 12/20 मी. DP रस्त्यासाठी जागा तडजोडीने अथवा तातडीने भूमी संपादन करण्यास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (कांता पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 29. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पु) प्रभाग क्र. 26 मधील विजयानंद पार्क अपा.ते नॅशनल स्कुल रस्त्यापर्यंत खडीकरण व डांबरीकरण करणे.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सवीस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु.1,08,68,672/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 30. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पु) प्रभाग क्र. 52 मधील तुळींज मुख्य रस्ता ते सेंट्रल पार्क रोड पर्यंत 12. मी.डी.पी. रस्त्यास माती भराव,खडीकरण व डांबरीकरण करणे.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सवीस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु. 1,22,75,934/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 31. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा (पु) वॉर्ड क्र.27 मधील पाम मार्केट ते यशवंत किर्ती अपा. पर्यंत नाला बांधणे कामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु. 2,05,01,372/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 32. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) नालासोपारा(पू) कार्यक्षेत्रातील कारगील नगर येथील शिवदुर्गा अपा. ते गोविंद पॅराडाईस पर्यंत नाला बांधणे कामी आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु.1,30,21,646/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे<br>**अनुमोदक :- (प्रशांत राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 33. | **वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प) प्रभाग क्र.84 मधील गास मोठा तलाव ते गास सनसिटी टर्न पर्यत आर.सी.सी. नाला बांधणे.** | **ठराव** :- वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या रु. 3,08,25,916/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास ही सभा आर्थिक, प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (अतुल साळुंखे) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 34. | **सन 2020-21 या वित्तीय वार्षिक वर्षाकरीता पावसाळ्यापुर्वी शहरातील रेल्वे क्रॉसिंग, कल्व्हर्ट रस्त्याखालील कल्व्हर्ट व स्ट्रॉम वॉटर ड्रेनेज मधील गाळ उपसण्यासाठी जादा क्षमतेचे 2 सुपर सक्शन मशीन भाडेतत्वावर पुरविणेकामी अथवा 2 सुपर सक्शन मशीन खरेदी करणेकामी आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देऊन ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे बी-2 निविदा दर मागविणेकामी मान्यता मिळणेबाबत.** | **निर्णय / ठराव** :- उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवुन असे ठरविण्यांत आले की, शहरातील रेल्वे क्रॉसिंग कल्व्हेट, रस्त्याखालील कल्व्हेट व स्टॉम वॉटर ड्रेनेज मधील गाळ उपसण्यासाठी जादा क्षमतेचे दोन सुपर सक्शन मशीन भाडे तत्वावर पुरविणे कामी होणाऱ्या एकूण **रक्कम रुपये** 1,29,60,000/- इतक्या अंदाजीत खर्चास अथवा दोन सुपर संक्शन मशीन खरेदी करणे कामी होणाऱ्या एकूण **रुपये** 6,00,00,000/- इतक्या अंदाजीत खर्चास तसेच सदर मशीनीचा वापर करणेकरीता आवश्यक कुशल मनुष्यबळ, इंधन व दैनंदिन देखभाल दुरुस्ती करीता प्रतीदिन **रक्कम रु.** 20,000/- इतक्या अंदाजित खर्चास हि सभा मंजूरी देत असून या कामी पुढील ई- निविदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (चंद्रकांत गोरीवले) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 35. | **विरार (पू) पापडखिंड धरणालगतच्या जलतरण तलावाचे व्यवस्थापन करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणे व निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदत वाढ देणेबाबत.** | **ठराव** :- विरार (पू) पापडखिंड धरणालगतच्या जलतरण तलाव चे व्यवस्थापन करणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देऊन होणाऱ्या खर्चास हि सभा मान्यता देत आहे व सदर कामाच्या ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील तीन वर्षाकरीता (सन 2020 ते 2023 ) पर्यंत निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 36. | **महापालिकेत समाविष्ठ गावांच्या वाढीव विकसीत भागाकरिता तसेच अमृत योजनेत अंतर्भुत न झालेल्या शिल्लक भागांकरिता पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने लागणारे** | **निर्णय/ ठराव** :- सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरविण्यात आले की,महानगरपालिकेत समाविष्ट गावांच्या वाढीव विकसीत भागात तसेच अमृत योजनेत अंतर्भाव न झालेल्या भागांसाठी प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकातील पाईपच्या परिमाणापेक्षा जास्त जलवाहिन्या प्रत्यक्षात अंथरावयाची गरज आहे. कारण प्रभाग समित्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या काही गावांमधील अंतर खुप जास्त असल्याने पाईपच्या परिमाणात निश्चितच वाढ होणे अपेक्षीत असून प्रशासनाने अंदाजपत्रकात दर्शविलेल्या परिमाणात वाढ करून |

**आवश्यक पाईप खरेदीकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

प्रभाग समिती निहाय्य आवश्यक पाईपचे परिमाण व त्यानुसार विविध व्यासाच्या पाईपची एकूण लांबी 1,25,000.00 मीटर याप्रमाणे पाईप खरेदीकामी येणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रू. 19,44,67,235/- खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

| **DI-K9 Pipes:** | **100.00** | **150.00** | **200.00** | **300.00** | **500.00** | **TOTAL** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **PRABAG A** | 20982.00 | 9265.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 30,247.00 | R mt. |
| **PRABAG B** | 700.00 | 1030.00 | 700.00 | 0.00 | 0.00 | 2,430.00 | R mt. |
| **PRABAG C** | 5310.00 | 7050.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 12,360.00 | R mt. |
| **PRABAG D** | 1048.00 | 515.00 | 0.00 | 600.00 | 0.00 | 2,163.00 | R mt. |
| **PRABAG E** | 4685.00 | 2805.00 | 0.00 | 4810.00 | 0.00 | 12,300.00 | R mt. |
| **PRABAG F** | 9000.00 | 8696.00 | 3280.00 | 0.00 | 0.00 | 20,976.00 | R mt. |
| **PRABAG G** | 10648.00 | 8550.00 | 4000.00 | 0.00 | 0.00 | 23,198.00 | R mt. |
| **PRABAG H** | 48.00 | 410.00 | 350.00 | 600.00 | 0.00 | 1,408.00 | R mt. |
| **PRABAG I** | 9768.00 | 8500.00 | 650.00 | 0.00 | 1000.00 | 19,918.00 | R mt. |
| **TOTAL** | **62189.00** | **46821.00** | **8980.00** | **6010.00** | **1000.00** | **125,000.00** | R mt. |

1)सदर पाईप लवकरात लवकर उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या रेट कॉन्ट्रक्ट नुसार

| | | | |
|---|---|---|---|
| | | | किंवा अन्य शासकिय रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी कामी त्वरित कार्यवाही करण्यास हि सभा सर्वानुमते मंजूरी देत आहे. सदर पाईप खरेदीसाठी पुढील कार्यवाहीचे सर्व अधिकार आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात येत असून सदर वाढीव परिमाणाचे पाईप खरेदीकामी येणाऱ्या खर्चाच्या अनुषंगाने आवश्यकती तरतूद पुढील आर्थिक वर्षात संबंधीत लेखाशिर्षावर करण्यात यावी.<br>2) यापुर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या रेट कॉन्ट्रक्ट नुसार खरेदी केलेले पाईप व सदर पाईप पॅनलवरील मंजूर ठेकेदारांमार्फत अंथरून घेण्यासाठी केलेल्या कार्यवाहीस व येणाऱ्या खर्चास हि सभा मंजूरी देत आहे.<br>3) "विकास निधी मधून पाणी पुरवठा शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था" या लेखाशिर्षावर "विकास निधी अंतर्गत सुसरी, राजावली, सातिवली, खोलसापाडा, कामण बंधारे बांधणे, पाणी पुरवठा योजना राबविणे, देहरजी एन.पी.व्हि. भरणा व इतर नविन उद्भव हा प्रकल्प पूर्ण ठेव तयार करणे तसेच कवडास बंधाऱ्याची उंची तत्वावर राबविण्यास वाढविणे तसेच सुर्या नदिपात्रात 5 बंधारे बांधणे." या लेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूद रू. 75 कोटी मधून रू. 17 कोटी तरतूद पुर्नविनियोजन करणे कामी मान्यता देण्यात येत आहे.<br><br>**अनुमोदक :- (रूपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

**नगरसचिव**
**वसई विरारशहर महानगरपालिका**